‘मुगले आझम’ बोलपटाचं संगीत

---

५ ऑगस्ट १९६0 रोजी के.असीफ यांचा ‘मुघल-ए-आझम’ म्हणजेच आपल्या परिचयाचा ‘मुगले आझम’ हा बोलपट भारतात १५0 थिएटरांत एकाच वेळी प्रदर्शित झाला.त्या घटनेला आता पन्नास वर्षे ऊलटून गेली.अजूनही हा बोलपट, त्याचं संगीत व त्यातली गाणी ही रसिकांच्या विशेष आवडीची आहेत.म्हणूनच पुन्हा एकदा त्यांचं स्मरण करावं असा विचार आहे.

‘मुगले आझम’ बोलपटा विषयी सायबर विश्वात (इंटरनेटवर) शेकडो संकेतस्थळं उपलब्ध आहेत.त्यातल्या गाण्यांविषयी व संगीताविषयी बरीचशी माहिती ‘दास्तान-ए-नौशाद : नौशाद यांची आत्मकथा’ [चंद्रकला प्रकाशन, पुणे, १९९१] हया श्री.शशिकांत किणीकर हयांनी लिहीलेल्या अभ्यासपूर्ण पुस्तकातल्या एका स्वतंत्र प्रकरणात वाचायला मिळते.या शिवाय दक्षिण मुंबईतल्या टाटा थिएटर परिसरातल्या ‘वाडिया लायब्ररी ऑफ म्युजिक’ मध्ये ‘नौशाद’ हयांच्यावरील वर्तमानपत्रं व मासिकातल्या लेखांच्या कात्रणांची एक बॉक्स फाईलच आहे.तिच्यामध्ये माहितीचा खजिना दडलेला आहे.

साधारणपणे १९४४ च्या आसपास दादर परिसरातल्या के.असीफ या तरूणानं ‘सलीम-अनारकली’ च्या कथित असफल प्रेम कहाणीवर एक भव्य बोलपट काढायचं स्वप्न बघितलं.त्याही अगोदर शिंपीकाम करणा-या हया तरूणाच्या लंब्या चवडया गप्पा व बाष्कळ बाता ऐकून मित्रमंडळी त्याची उघडपणे टिंगलटवाळी करीत असत.त्यात

त्यावेळी उमेदवारी करणारे ‘नौशाद’ सुद्धा सामील असत. पण पुढं खरोखरच त्या तरूणाचं स्वप्न प्रत्यक्षात आलं. इतकंच नव्हे तर त्यानं इतिहास घडवला. त्यात नौशादांच्या संगीताचा वाटा फार मोठा आहे.

संगीत दिग्दर्शनासाठी सुरूवातीला पं. गोविंदराम, गुलाम हैदर व अनिल बिश्वास यांचा विचार झाला होता. पण १९५५ च्या आसपास नौशादनी संगीत द्यायचं हे नक्की झालं. गीतकार म्हणून शकील बदायुनी हयांची नियुक्ती फार आधीपासूनच झालेली होती. बोलपटाचं काम खास असिफमियाँच्या स्टाईलनं सुरू झालं होतं. चार चार संवादलेखक नेमले होते. पटकथा आकार घेण्यात बरीच मेहनत घेतली जात होती. अनेक फायनान्सर्सही झाले. पण शेवटी शापूरजी व त्यांचे चिरंजीव पालनजी ही गुजराथी पिता-पुत्रांची जोडी पैसा गुंतवायला तयार झाली. त्याकरिता ‘स्टर्लिंग इन्वेस्टमेन्ट कॉर्पोरेशन प्रा. लि.’ हया कंपनीची स्थापना पण झाली. दक्षिण मुंबईत चर्चगेट परिसरात शेकडो देखण्या इमारती बांधण्याचा अनुभव असलेल्या हया बापलेकांना मायावी चित्रपट सृष्टीची मात्र काहीच माहिती नव्हती. परिणामी दीडेक कोटी रूपयांहून अधिक रक्कम गुंतवून बनवलेला हा बोलपट आपल्याला भिकेकंगाल बनवणार हयाची त्यांना खात्री पटत चालली होती. दरम्यान हयाच कहाणीवरचा, ‘अनारकली’ हा प्रदीपकुमार व बीना रॉय नं काम केलेला व सी. रामचंद्र हयांच्या संगीतानं नटलेला बोलपट १९५३ साली प्रदर्शित झाला. त्यातल्या अवीट गोडीच्या गाण्यांनी लोकप्रियतेचे नवीन उच्चांक निर्माण केले. तरीही के. असीफ अजिबात विचलित झाले नाहीत. ऊलट दुप्पट जोमानं कामाला लागले. संगीताच्या बाबतीत ते स्वतः जागरूक

राहून जातीनं लक्ष घालू लागले.‘अनारकली’तला सलीम गाणं गातो.पण ‘मुगले आझम’ मधला सलीम (भूमिका अगदी दिलीपकुमार करणार असले तरीही) गाणार नव्हता.पार्श्वसंगीतात व गाण्यांच्या मधल्या तुकडयांत (इंटरल्यूड) पाश्चिमात्य वाद्यं वाजली तरी चालणार होती.पण गाणी मात्र अभिजात राग रागिण्यांवर आधारित व नृत्याला व भाव प्रकट करायला पोषक अशीच असणार होती.त्यासाठी गीतकार शकील बदायुनी, संगीतकार नौशाद व बोलपटाचे सर्वेसर्वा के.असिफमियाँ अहोरात्र मेहनत घेऊ लागले.एकेक शब्द, एकेक ओळ नीट पारखून घ्यायला सुरूवात झाली.बोलपटाची भाषा उर्दू व संवाद काहीसे बोजड असले तरी गाण्याचे शब्द मात्र सोप्या हिंदी भाषेतले व बोली उर्दूतले होते.

अकबर बादशहाच्या समोर भर दरबारात आपल्या प्रेमाची जाहीर कबूली देण्याचा प्रसंग ‘अनारकली’ व ‘मुगले आझम’ हया दोन्ही बोलपटांत आहे.पण त्याचं सादरीकरण मात्र निराळं आहे.आज त्याच प्रसंगाच्या चित्रीकरणामुळं व गाण्यामुळं चित्रपट इतका काळ ऊलटून गेल्यावरही लोकांच्या ध्यानात आहे.ते गीत लिहायला नौशाद व शकील बदायुनी यांनी रात्रभर जागरण केलेलं आहे.गीत रचावं की गझल यावर आधी बराच वेळ विचार झाला.कितीतरी मुखडे सुचले.पण पसंत न पडल्याने कागद चुरगाळून फेकून देण्यात आले.मध्यरात्र ऊलटून गेली.अगदी पहाटे पहाटे हार्मोनियम पुढयात ओढून नौशाद एका जुन्या लोकगीताच्या ओळी सहजच गाऊ लागले, ‘प्रेम करी, चोरी करी नई’.ते ऐकून शकीलना पटदिशी कॅच लाइन सापडली – ‘प्यार किया, कोई चोरी नही की’.मग पुढं ‘प्यार किया

तो डरना क्या' हा मुखडा व पहिले दोन अंतरे पटापट सुचले. गाण्याचं तोंड तर फारच छान जमून आलं होतं.

"प्यार किया तो डरना क्या,
प्यार किया कोई चोरी नही की,
चुप चुप आहे भरना क्या.
जब प्यार किया तो डरना क्या"

गाडी पुन्हा अडली ती शेवटच्या अंत-यावर. अकबर बादशाहचा मान राखून, सर्वशक्तीमान अश्या खुदा समोर सगळेच समान असल्याची जाणीव त्याला करून द्यायचं मोठं अवघड काम काही ओळींत करायचं होतं. ब-याच खटपटीनंतर मनाजोगता अंतरा तयार झाला.

'आज कहेंगे दिलका फसाना, जान भी लेले चाहे जमाना,
परदा नही जब कोई खुदासे, परदा नही जब कोई खुदासे,
बंदों से परदा करना क्या, जब प्यार किया तो डरना क्या.'

हया ओळी लिहिल्या गेल्या तेव्हां पहाट झाली होती. सर्वांनाच हे गाणं अतिशय आवडलं व त्याच्या चालीवर व चित्रीकरणावर चर्चा सुरू झाली. हे गाणं पाण्यासारखा पैसा ओतून उभारलेल्या शीश महालात चित्रीत व्हायचं होतं. चित्रपटाचं ते एक प्रमुख आकर्षण ठरणार होतं. त्यामुळं ते सर्वांगसुंदर व्हावं याकरिता सगळेच जण मनापासून झटत होते. नवनवीन कल्पना सुचवत होते. गाणं सुरू व्हायच्या अगोदर अनारकली व सख्या नाचत नाचत प्रवेश करत असतांना

दरबारी रागातलं काही गाणं बजावणं दाखवून वातावरण निर्मिती करावी असा एक प्रस्ताव पुढं आला. त्यात आठ दहा सतार व सारंगीवादक घ्यायचं ठरलं. हया वाद्यमेळाचं संचालन उस्ताद अब्दुल हलीम जाफर खान व पं. राम नारायण हयांनी करावं असं ठरलं. त्याकाळचे दिग्गज गवई उस्ताद हाफीज अहमद खान, नियाज अहमद खान व फैय्याज अहमद खान यांचेकडून एकत्र 'दरबारी कानडा' हा भारदस्त राग गाऊन घेतला व तो तुकडा गाण्याच्या अगोदर टाकला. त्यात पखवाज वादनासाठी बनारसचे प्रसिद्ध पखवाज वादक रामदासजी यांना पाचारण करण्यात आलं. बरोबर भरपूर वाद्यमेळ ही वापरला. या तीन महान गायकांच्या 'दरबारी' रागाच्या सुरावटींचं चित्रीकरण झालं तेव्हां तिघांनीही सुचवल्यावरून त्यांनाच रंगरंगोटी करून दरबारात बसवण्यात आलं. त्यामुळं प्रसंग उठावदार तर झालाच पण तिघांचीही छबी फिल्मवर कायमची जपली गेली. हया अश्या धीर गंभीर वातावरणनिर्मितीनंतर अनारकलीचं गाणं सुरू व्हायचं होतं. पण हा दरबारी मूड जाऊन नवा बनावा हयाकरिता गीताच्या पहिल्या दोन ओळी वाद्यमेळाशिवाय लता मंगेशकरांच्या आवाजात गाऊन घेण्यात आल्या.

'इन्सान किसी से दुनियामे, इक बार मुहब्बत करता है,
इस दर्दको लेकर जीता है, इस दर्दको लेकर मरता है'

मग वाद्यमेळाचा एक मोठा तुकडा झाल्यावर गाणं सुरू होतं - 'प्यार किया तो डरना क्या'. हया गाण्याची चाल 'मेघ' रागात बांधलेली आहे. केवळ तेवढीच गुणगुणून बघितली तर ती आजही सपक

वाटते.पण त्याच्या आधी एवढी नेपथ्यरचना झाली असल्याने ती ऊठावदार वाटते.या गाण्यात ‘छुप ना सकेगा इष्क हमारा, चारों तरफ है उनका नज़ारा’ या ओळी दोनदा आल्या आहेत.शीश महालातल्या आरशांमध्ये नाचणा-या अनारकलीच्या अनेक प्रतिमा दिसायला लागतात.त्यावेळी एका अनारकलीचा आवाज अनेक जणींचा व्हायला हवा होता.मग त्या ओळी एकदा लता मंगेशकरांच्या आवाजात व पुन्हा कोरस सह गाऊन घेतल्या व ही दोन्ही मुद्रणं एकमेकांत मिसळून टाकून हवा तो परिणाम साधला.

त्यावेळी मुंबईत अद्ययावत अशी ध्वनिमुद्रण व्यवस्था व स्टुडिओ नव्हते.दादरच्या रंगमहाल स्टुडिओच्या एका मजल्यावर जाडया भरडया कांबळयांचा शामियाना ऊभारून त्यात ध्वनिमुद्रणं घेण्यात आली होती.आवाज घुमू नये म्हणून फरशीवर नारळाच्या शेंडया पसरल्या होत्या.लता मंगेशकरांसाठी खास शामियाना (केबिन) ऊभारला होता.विशेष म्हणजे एक ध्वनिवर्धक (मायक्रोफोन) लताजींसाठी व दुसरा वाद्यमेळातल्या सगळया वादकांसाठी वापरून ही ध्वनिमुद्रणं केलेली आहेत.

‘प्यार किया तो डरना क्या’ च्या खालोखाल लोकप्रिय झालेलं गाणं म्हणजे ‘मोहे पनघट पे नंदलाल छेड गयो रे’.जोधा-अकबर हया हिंदू-मुस्लिम दांपत्यातल्या अनोख्या सामंजस्याच्या प्रसंगावर हे गाणं रचलेलं आहे.महालातल्या राणीवशात ‘श्रीकृष्ण जन्माचा’ सोहोळा सुरू आहे.ख-याखु-या सोन्याची, लंगडया बाळकृष्णाची सुबक मूर्ती पाळण्यात ठेवलेली आहे.स्वतः शहेनशाह अकबर चौरंगावर बसून

पाळण्याची दोरी हातात घेऊन झोका देत आहेत. राजपुत्र सलीमही बाजूलाच बसला आहे. महाराणी जोधाबाई हे सगळं मोठया कौतुकानं पाहते आहे. अश्या वेळी हे गाणं योजलं आहे. पाण्यासाठी निघालेल्या गोपींच्या घोळक्याला नटखट श्रीकृष्ण छेडतो आहे. त्यापैकी एक गोपी गोड तक्रार करते आहे.

'मोहे पनघट पे नंदलाल छेड गयो रे
मोरी नाजुक कलैय्या मरोड गयो रे'

ही ठुमरी हया बोलपटाचे विख्यात नृत्य दिग्दर्शक लच्छू महाराज यांचे काका कालका बिंदादीन महाराज यांनी रचलेली होती. ते वाजिद अली शाह यांच्या दरबारी होते. त्यामुळे लच्छू महाराज हया गाण्यावर अतिशय खुश झाले होते. त्यांनी खूप मेहनत घेऊन मधुबालाला नृत्य शिकवलं. नौशादनी 'पंचम से गारा' या रागात त्याची चाल बांधून लता मंगेशकरांच्या आवाजात मुद्रित केलं. ते ऐकून असिफसाहेबांनी त्यांना गाणं पुन्हा एकदा ध्वनिमुद्रित करायला सांगितलं. पाण्याला निघालेली गोपी एकटी कशी असेल? तिच्या बरोबर सख्याही असणारच ना? त्यांनाही या नृत्य प्रसंगात घेणार आहे म्हणाले. मग हया गाण्याचं कोरस सह पुन्हा मुद्रण करण्यात आलं. या गाण्यानं पण रसिकांना वेड लावलं. एका खूप जुन्या व पारंपारिक ठुमरीचं यात पुनरूज्जीवन झालं होतं. विशेष म्हणजे सिनेमासारख्या सर्वदूर पोहोचणा-या ताकदवान माध्यमातनं ते सादर झालं होतं. गंमत म्हणजे याची गायिका हिंदू तर गाण्याशी संबंधित बाकीची सगळी मंडळी

म्हणजे निर्माता, गीतकार व संगीतकार ही मुसलमान होती. यात पन्नालाल घोष हयांनी बासरी वाजवली आहे.

या अगोदर १९३५ ते १९४0 च्या दरम्यान कलकत्त्याची गायिका मिस इंदुबाला, तसेच मुंबईचे गवई उस्ताद अझमत हुसेन खानसाहेब यांच्या आवाजात हे गाणं दोन स्वतंत्र ध्वनिमुद्रिकांवरती बाजारात आलं होतं. अनुक्रमे एच.एम.व्ही.व कोलंबिया लेबलवर ग्रामोफोन कंपनीनं 'मोहे पनघट पे नंदलाल' हया शीर्षकानं हे गाणं वितरीत केलं होतं. हया दोन्हीही ध्वनिमुद्रिका खूप गाजल्या होत्या. लेबलवरती गीतकाराचं नाव मात्र नव्हतं. त्याच सुमारास 'दि टिवन - The Twin' कंपनीच्या पिवळया लेबलवर मा. मुकुंद हयांच्या आवाजात हयाच गाण्याची आणखी एक ध्वनिमुद्रिका निघाली. तिच्यावर मात्र कवी-रघुनाथ ब्रम्हभटट असं छापलेलं होतं. ही तिसरी ध्वनिमुद्रिका फारशी गाजली नव्हती. 'मुगले आझम' बोलपट प्रकाशित झाला, त्यातली गाणी गाजली. पण हया ध्वनिमुद्रिकांविषयी काहीच चर्चा उपस्थित झाली नव्हती. पुढं २00४ साली त्याची रंगीत आवृत्ती प्रदर्शित झाली. त्यावेळी रघुनाथ ब्रम्हभटट यांचे नातू राज ब्रम्हभटट यांनी वाद निर्माण करून हे काव्य माझ्या वडिलांचं असून शकील बदायुनी यांनी उचललं आहे असा दावा करून नुकसान भरपाई मागितली. माध्यमांना काही काळ हा विषय चघळायला मिळाला खरा पण त्यातून काही निष्पन्न मात्र झालं नाही. तोवर हया गाण्याशी संबंधित गीतकार, संगीतकार व निर्माता ही सगळीच जणं केव्हांच हे जग सोडून गेलेली होती. उर्दू शेरोशायरीशी परिचित मंडळींना मात्र हयात काहीच वावगं वाटलं नाही. कारण या प्रकाराला 'दूसरोंकी जमीं

पर चलना' असं म्हणतात. त्यामुळं 'मोहे पनघटपे नंदलाल छेड गयो रे, मोरी नाजुक कलैय्या मरोड गयो रे' हा पारंपारिक मुखडा घेऊन शकील बदायुनींनी पुढचे अंतरे स्वतंत्र लिहिले होते. हिंदीत व विशेषतः उर्दू शायरीच्या बाबत हे असं सर्रास घडतं व त्यात काही विशेष वावगं समजत नाहीत. उदा. गुलजारांनीच 'मौसम' बोलपटात मिर्झा गालिबच्या प्रसिद्ध ओळी 'दिल ढूँढता है फिर वोही' नं सुरूवात करून पुढं स्वतःचं गीत रचलं आहे. किंवा 'एक नजर' बोलपटात मजरूह सुलतानपुरींनी 'मीर ताकी मीर'च्या 'पत्ता पत्ता बूटा बूटा, हाल हमारा जाने है' हया ओळींनी आपल्या गीताचा मुखडा रचला आहे. अशी पुष्कळ उदाहरणं देता येतील. 'प्यार किया तो डरना क्या' व 'मोहे पनघटपे' ही दोन गाणी सदाबहार असून बोलपटाचा संदर्भ नसला तरीही वारंवार ऐकली जाणार आहेत.

इतर गाण्यांमध्ये, 'रागेश्री' (की रागेश्वरी?) रागातलं 'शुभ दिन आयो राज दुलारा, साहिबे-आलम जग उजियारा' हे तानसेन वर चित्रित झालेलं व 'प्रेम जोबन बन के, सुंदरी पिया ओर चली' हे 'सोहोनी' रागातलं सलीम अनारकलीच्या प्रणय प्रसंगावरचं अशी दोन गाणी आहेत. तानसेनच्या आवाजासाठी उस्ताद बडे गुलाम अली खान यांनी गावं असं नौशादना वाटत होतं. पूर्वी असा प्रयत्न 'बैजू बावरा' च्या वेळी त्यांनी केला होता. पण ते अजिबात तयार झाले नव्हते. म्हणून नौशादना उस्ताद अमीर खान यांच्याकडून त्यावेळी गाऊन घ्यावं लागलं होतं. के. असीफनी मात्र त्यांच्या खास पद्धतीनं मोर्चेबांधणी केली. त्यावेळी पार्श्वगायकाला एका गाण्याचे तीनशे पासून जास्तीत जास्त हजारभर रूपये मिळायचे. उस्ताद बडे गुलाम

अली खानसाहेबांना हे ठाऊक असावं. पण ही ब्याद टळावी म्हणून एका गाण्याची पंचवीस हजार रूपये इतकी बिदागी खानसाहेबांनी मागितली. असीफमियाँनी ही अवाजवी बिदागी मान्य तर केलीच पण 'आम्ही आपल्याला काय बिदागी देणार ? आपली योग्यता तर याहून कितीतरी अधिक आहे' असं अतिशय नम्रपणे सांगून त्यांचं मनच जिंकलं. अगोदर एकच गाणं घ्यायचं ठरलं होतं. पण मग आणखी एक गाणं घेऊन खानसाहेबांना एकूण पन्नास हजार रूपये बिदागी दिली असं म्हणतात. मग मात्र खानसाहेबांनी पण मनापासून सहकार्य दिलं. तानसेन रियाझ करत असतानाचं 'शुभ दिन आयो, राज दुलारा' अगदी खानसाहेबांच्या तबियतीप्रमाणं जोरकसपणे ध्वनिमुद्रित झालं. सोहोनी रागातल्या 'प्रेम जोगन बनकर, सुंदरी पियाके ओर चली' च्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी मात्र नौशादनी असिफमियाँना बोलावून घेतलं. त्यांनी अत्यंत नम्रपणे खानसाहेबांना हा महत्वाचा प्रसंग समजावून सांगितला. म्हणाले, 'हे गाणं पण तानसेनच्या रियाझाचंच आहे पण तो पडद्यावर फार काळ दिसणार मात्र नाही. अनारकलीला उपवनात येण्याचा संदेश मिळाल्यावर गाणं सुरू होईल व सलीम-अनारकलीच्या प्रणय प्रसंगावर हे गाणं पार्श्वभागी वाजत राहील. आता कसं गायचं ते मी तुमच्यावरच सोपवितो'. प्रसंगाची वेळ मध्यरात्र ऊलटून गेल्यानंतरची असल्याने 'सोहोनी' रागाची योजना करून साजेशी बंदिश लिहून घेतलेली होती. तानसेनाच्या महालात रियाझ चालू असतांनाची आलापी थोडीशी 'नरम' हवीय म्हटल्यावर खानसाहेबांनी तो प्रसंग बघूनच गायचा आग्रह धरला. मग तशी व्यवस्था करण्यात आली. तो सीन खानसाहेबांनी पडद्यावर अनेकवेळा बघितला. तबला संगतीला ऊस्ताद निजामुद्दीनखान

शेजारीच बसले होते. मधुबालाकडे बघून खानसाहेब वारंवार त्यांना सांगत होते, 'अमां निजामुद्दीन, कितनी खूबसूरत लौंडिया (दासी) है'. खानसाहेबांनी मग सीनची मागणी पाहून मनाशी काही विचार केला. एक रिहर्सल केली व सीन तसाच चालू ठेवायला लावूनच ते गायले. भारतीय बोलपटांच्या इतिहासात शुद्ध शास्त्रीय रागातल्या चीजेवर आधारित तब्बल पाच मिनिटांचं पहिलं प्रणयगीत साकार झालं व 'मुगले आझम' बोलपटाचं एक आकर्षण ठरलं. त्याची धुंदी आज पन्नास वर्षांनंतरही तशीच आहे. गंमत म्हणजे खुद्द खानसाहेबच हया गाण्याच्या एवढया प्रेमात पडले की पुढे आपल्या मैफिलींमध्ये आवर्जून गात असत. आज हे गाणं 'यू टयूब' मध्ये पहायला व ऐकायला मिळतं.

खानसाहेबांशिवाय आणखी पुरूष पार्श्वगायकांत फक्त महंमद रफींच्या आवाजातलं 'अय मुहब्बत जिंदाबाद' हे एकच गाणं आहे. ते पण नाटयपूर्ण प्रसंगात वापरलं असून त्यात कोरसचा फार प्रभावी वापर केलेला आहे. खूप ऊंच आवाजातलं हे गाणं रफीसाहेबांनी फारच छान गायलं आहे. बाकीची सगळी गाणी लता मंगेशकरांच्या आवाजात असून 'तेरी महफिलमें किस्मत, आजमाके हम भी देखेंगे' हया कव्वाली मध्ये शमशाद बेगम सहगायिका आहेत. बोलपटात ही कव्वाली सातेक मिनिटांची असून तिचं चित्रीकरण आदर्श ठरावं इतकं सुंदर झालं आहे. शीश महल मधलं 'ये दिलकी लगी' हे कोरसगीत 'जयजयवंती' रागात बांधलेलं असून सलीम अनारकलीच्या पहिल्या (व अखेरच्या) रात्री मनोरंजनासाठी योजलेलं आहे. पहाट होताच दोघांची ताटातूट अटळ आहे हे सलीम सोडून सर्वांनाच माहीत

असतं. त्यामुळेच 'जब रात है ऐसी मतवाली, तो सुबहका आलम क्या होगा' हया ओळींतली भावना 'जयजयवंती' रागाच्या सुरांतून यथार्थ पणे प्रगट झाली आहे. बेहोश होऊन शुद्ध हरपत चाललेला सलीम बरीच आदळआपट करतो व त्याच वेळी शिपाई अनारकलीला घेऊन जायला येतात. त्या पार्श्वभूमीवर 'यमन' रागाच्या सुरावटींत बांधलेलं गाणं सुरू होतं -

"खुदा निगेहबाँ हो तुम्हारा, धडकते दिलका पयाम ले लो
तुम्हारी दुनियासे जा रहे हैं उठो हमारा सलाम ले लो"

हे गाणं ऐकणं व पाहणं हा एक अनोखा व रोमांचकारी अनुभव आहे. थिएटरातल्या मोठया पडद्यावर पाहताना अक्षरशः अंगावर शहारा येतो. चित्रपटातल्या प्रसंगानुसार पाश्चात्य वाद्यमेळ कायम ठेवून त्यात 'यमन' रागाचा बाज कायम ठेवण्यात आलेला आहे. यमन हा सदा बहार व सर्व मूडसच्या गाण्यांना पोषक असा राग! त्याची ताकद हया गाण्यात जाणवते. दादरच्या त्या दिव्य स्टुडियोत 'मुगले आझम' चं ध्वनिमुद्रण झालेलं हे पहिलं गाणं. त्यावेळी असिफमियाँ उपस्थित नव्हते. गाणं ऐकून ते नौशादना विचारू लागले, 'आपने इतनी बढिया रिकार्डिंग किस थिएटरमें की?'.

दरबारी रागात बांधलेलं 'मुहब्बतकी झूठी, कहानी पे रोये' हे आणखी एक सुंदर गाणं. त्याचं चित्रीकरण पण लाजवाब असंच झालंय. हया बोलपटात लताजींच्या आवाजात 'इस्लामिक' म्हणता येईल असं एक गाणं आहे. ते म्हणजे 'केदार' रागातलं 'बेकस पे करम कीजीये,

सरकार-ए-मदीना' . खुदाला उद्देशून हे गाणं आहे . अश्या गाण्यांना मुसलमानांच्यात 'नात' असं म्हणतात . पुढं हे गाणं ७८ गतीच्या ध्वनिमुद्रिकेवर वितरित करायचं ठरलं तेव्हा ते नेहमीच्या 'कुत्रा' छाप लेबल वर न करता 'अेंजल' लेबलवर केलं गेलं . (हयात एक छोटा अेंजल म्हणजे देवदूत तबकडीवर बसून हातातल्या पिसाच्या टोकानं खाचा पाडतानाचं चित्र आहे) . त्याचं कारण मुसलमानांत 'कुत्ता' व त्याचं चित्र निषिद्ध मानतात . ही रेकॉर्ड उत्तरेत उर्दू भाषिकांत 'इस्लामिक' म्हणून अफाट खपणार हयाची खात्रीच होती . त्यामुळेच तिच्या पाठच्या बाजूला 'खुदा' शब्द असलेलं गाणं 'खुदा निगेहबान हो तुम्हारा' घेण्यात आलं . अपेक्षे प्रमाणं ती रेकॉर्ड तिकडे अगदी तडाखेबंद खपली .

नौशादनी संगीत दिलेली काही गाणी वगळावी लागली . पण चित्रीकरणही झालेली दोन गाणी कठोरपणे काढून टाकावी लागली . ही बाब नौशादांसाठी फारच दुःखदायक होती . पण कथावस्तूच्या प्रवाहीपणाला ती दोन गाणी अडथळा आणत होती . चित्रपटाची लांबी पण फार वाढत होती . शहजादा सलीमच्या मनोरंजनासाठी बहार (निगार सुलताना) यमुना नदीत होडयांची शर्यत आयोजित करते . त्या होडयांत नर्तकी गात गात नाच करतात . त्या गाण्याचे बोल होते - 'हुस्नकी बारात चली मौसमे बहारमे, दिलका चमन होके मगन, झूम उठा बहारमें' . सलीम यमुनेच्या किना-यावर बसून ही शर्यत पहात असतो . हे गाणं असीफनी स्टुडियोत व बाहेर असं दोन्ही प्रकारांनी घेतलं होतं . त्याच्या पाठोपाठच अनारकली व बहार यांच्यातला दरबारातला मुकाबला 'तेरी महफिलमे किस्मत,

आजमाके हम भी देखेंगे' या कव्वालीतून येणार होता. हया दोन्ही पैकी एकच गाणं ठेवायचं असं फायनल ट्रायलच्या वेळी ठरलं. सर्वा नुमते कव्वालीच ठेवावी असा निर्णय झाला. दुसरं गाणं रफीसाहेबांच्या आवाजातलं होतं. अनारकलीला सलीमपासून वेगळं केलं जातं त्यावेळी हे गाणं येतं - 'अकेला हमको छोडके, हमारा दिल तोडके, कहाँ चले, कहाँ चले' असे त्याचे शब्द होते. ते गाणं ध्वनिमुद्रित झाल्यावर 'सलीम गातो' हे असिफ साहेबांना खटकलं व ते गाणं रद्द झालं. आणखी दोन गाणी पण काढून टाकण्यात आली होती. पण चित्रपट सुपर हिट झाल्यावर ती मागाहून समाविष्ट करण्यात आली. रौप्यमहोत्सव प्रसंगी 'हमें काश तुमसे, मुहब्बत ना होती' हे गाणं व सुवर्णमहोत्सवाच्या वेळी 'ऐ इष्क है यह सब दुनियावाले' ही लता मंगेशकरांनी गायिलेली दोन गाणी घालण्यात आली. ही दोन्ही गाणी इतर गाण्यांच्या तुलनेत फारच सामान्य होती. पण बोलपटाच्या लोकप्रियतेच्या लाटेत धकून गेली. पण त्यामुळं चित्रपटाचा कालावधी तीन तास सतरा मिनिटं इतका झाला. फिल्मची लांबी ५०८८ मीटर झाली व वीस रीळांमध्ये ती वितरित झाली.

पुढे २००४ मध्ये हा सिनेमा रंगीत बनवला त्यावेळी ही दोन गाणी पुन्हा काढून टाकण्यात आली. काही प्रसंग छाटले. तरीही कालावधी दोन तास व सव्वीस मिनिटं इतका झालाच. हया दोन्ही आवृत्या आज डी. व्ही. डी. च्या माध्यमातून आपण नगण्य किंमतीला विकत घेऊन आपल्या संग्रही ठेऊ शकतो. मात्र काढून टाकलेली गाणी जर जपून ठेवली असती तर आज रेकॉर्डवर किंवा सी. डी. वर वितरीत करता आली असती. पुढं स्व. कमाल अमरोहींच्या गाजलेल्या 'पाकिजा' हया

बोलपटातल्या मुद्रित पण अप्रकाशित गाण्यांची एक एल.पी.रेकॉर्ड 'पाकिजा रंगबारंग' हया नावानं निघाली होती.तसंच काहीसं होऊ शकलं असतं.आपली एवढी चांगली गाणी लोकांपुढं येऊ शकली नाहीत याचं नौशादना खूप वाईट वाटलं होतं.

हा १९५५-६0 चा कालखंड होता व त्यावर पार्श्वगायिका म्हणून लताजींचा ठसा निःसंशयपणे ऊमटलेला होता.सर्वच आघाडीच्या संगीतकारांकडं त्या गात होत्या.त्यात 'मुगले आझम' मधली गाणी सर्वांगसुंदर म्हणावी अशीच होती.ती गाजणार हयाची असीफना खात्रीच होती.त्या काळी बोलपट प्रदर्शित व्हायच्या अगोदर त्यातल्या गाण्यांच्या ७८ गतीच्या ध्वनिमुद्रिका बनवून थिएटरात मध्यंतरात वाजवीत असत.आगामी बोलपटाचं आकर्षण व मौखिक प्रसिद्धीपण होत असे.रेडिओवरूनही वाजवीत.'मुगले आझम' च्या गाण्यांच्या पण ध्वनिमुद्रिका बनविण्यात आल्या.ती गाणी प्रकाशित करायचा आग्रह नौशादांनी धरला.पण असीफसाहेबांनी नकार दिला.कारण चित्रपट केव्हां पुरा होईल हयाची त्यांनाच खात्री नव्हती.खूप ऊशीर झाला तर गाणी ऐकून ऐकून जुनी होतील व त्याचा परिणाम चित्रपट प्रदर्शनावर होईल असं त्यांना वाटत होतं.त्यामुळे चित्रपट व ध्वनिमुद्रिका एकाच वेळी प्रदर्शित करण्यात आले.विशेष म्हणजे सिनेमाची तिकीटं व ध्वनिमुद्रिकासुद्धा विकत घ्यायला रसिकांच्या रांगा लागल्या.पुढं त्यातल्या निवडक गाण्यांची एक ई.पी.व एक एल.पी.रेकॉर्ड वितरीत करण्यात आली.ज्युबिली साजरी झाल्यावर तर त्यातल्या संवाद व गाण्यांच्या तीन एल.पी.रेकॉर्डसचा एक संच प्रदर्शित झाला व खूप खपला.आजही ती गाणी तेवढीच लोकप्रिय

आहेत हे 'यू टयूब' वर पाहता येतं. या सिनेमाची इंग्रजी आवृत्ती निघाली होती असं म्हणतात. प्रदर्शित झाली होती का ते माहित नाही. मात्र शोध घेऊनही तिची प्रिंट अद्याप मिळालेली नाही.

तामीळ मध्ये डब झालेली आवृत्ती मात्र 'अकबर' हया नावानं प्रदर्शित झाली होती. त्यातले संवाद व गाणी थंबादासकडून अनुवादित करवून घेतली होती. पी. सुशीला हयांनी लताजींच्या आवाजातली बहुतेक सगळी गाणी गायिली होती. अनारकली व बहारच्या कव्वालीत त्यांना पी. जी. क्रिष्णवेणी (जिक्की) यांनी साथ केली होती. जिक्की हया प्रसिद्ध तेलुगू / तामिळ गायक ए. एम. राजा यांच्या पत्नी. ['आह' हया राजकपूरांच्या बोलपटाच्या तामीळ व तेलगू आवृत्यांच्या गाण्यांत दोघं एकत्र गायले व प्रेमात पडून विवाहबद्ध झाले]. 'जिक्की'कडूनच 'खुदा निगेहबान तुम्हारा' हया गाण्याची तामिळ आवृत्ती पण गाऊन घेण्यात आली होती. 'बेकस पे करम कीजीये सरकार-ए-मदीना' तल्या 'सरकार-ए-मदीना' शब्दाचं तामिळ भाषांतर होऊच शकत नसल्यानं ते शब्द तसेच ठेवण्यात आले. 'मुहब्बतकी झूठी कहानी पे रोये' हया गाण्याचा तामीळ अवतार पी. सुशीला हयांच्या आवाजात असून तो अद्यापही आपली लोकप्रियता टिकवून आहे. उच्चारांची अडचण असल्याने 'ए मुहब्बत जिंदाबाद' हे गाणं महंमद रफी गाऊ शकले नाहीत. ते एका तामिळ गायकाकडून गाऊन घेण्यात आलं. हया गाण्यांचंही संगीत नौशादांचंच होतं. एका गाण्याचं संगीत मात्र एस. व्ही. वेंकटरमण हयांनी दिलं होतं व ते विख्यात 'राधा-जयलक्ष्मी' हया चुलत बहिणीं पैकी 'जयलक्ष्मी' हयांनी गायिलं होतं. शास्त्रीय रागदारी संगीतावर आधारित हे गाणं बडे गुलाम अली

खान हयांच्या 'प्रेम जोगन बनकर' च्या ऐवजी वापरलं होतं. ही सगळी ध्वनिमुद्रणं हया मंडळींना मुंबईस बोलावून दादरच्या त्याच खास स्टुडियोत घेण्यात आली होती. तामिळ मध्ये डबिंग करण्यासाठी खास कलाकार बोलावून घेण्यात आले होते. तिकडे दक्षिणेत मात्र 'अकबर' तामिळपट सपशेल आपटला. आज तो कुठं धूळ खात पडलाय की नष्ट झालाय कुणास ठाऊक. त्यामुळंच कदाचित नाऊमेद होऊन असीफनी इंग्रजी आवृत्तीचा नाद सोडून दिला असावा. इंग्लंडहून अगदी 'शेक्सपियरीन' नट मंडळी डबिंग साठी आणायची त्यांची सगळी तयारी वाया गेली.

२००४ साली रंगीत 'मुगले आझम' प्रकाशित झाला. २००५ मध्ये त्याची तामिळ रंगावृत्ती 'अनारकली' हया नावानं बनवली व प्रदर्शित पण झाली. रूबेन राज यांनी त्याला आधुनिक काळाला साजेसं संगीत दिलं आहे. स्वर्णलथा, चित्रा व अनबान कुथोस हयांनी गाणी गायिली आहेत. त्यात १९६० च्या तामिळ 'अकबर' पेक्षा निराळी गाणी आहेत. बहार व अनारकलीची कव्वाली एकाच गायिकेच्या - स्वर्ण लथाच्या आवाजात आहे. पण त्याचं पुढं काय झालं ते कळायला मार्ग नाही. आज त्याची प्रिंट किंवा व्ही. सी. डी. / डी. व्ही. डी. काही उपलब्ध आहे काय याचा शोध घ्यावा लागेल. साठच्या दशकातले हिंदीतून तामिळमध्ये डब झालेले आणखी काही बोलपट ः 'आन', 'उडन खटोला' व 'नया दौर'. ते सुद्धा फक्त दिलीपकुमारांचे. त्याचं एक कारण म्हणजे त्यावेळी मद्रास मधूनच 'आझाद' बोलपटाची झालेली निर्मिती. त्यात दिलीपकुमार होते व तो बोलपट तिकडेही गाजला होता. अगदी अलिकडे 'मधुमती' व 'नया दौर'च्या हिंदी व

तामिळ रंगीत आवृत्या निघाल्या पण प्रतिसादा अभावी डब्यात गेल्या. मुख्यत्वे गाण्यांकरिताच हे बोलपट रंगविले गेले व तामिळ मध्ये डब केले गेले होते. हयातली काही थोडीशी गाणी आज इंटरनेटवर ऐकायला मिळतात. 'प्यार किया तो डरना क्या' ची तामिळ गाण्याशी रिमिक्स केलेली एक व्हिडियो क्लिप 'यू टयूब' वर पहायला व ऐकायला मिळते. इतरही बहुतेक सर्व गाणी (कृष्ण धवल व रंगीत) नेटिझन्सनी प्रेमानं भरून ठेवली आहेत.

'मुगले आझम' बोलपटानं तिकीट विक्रीचे व ऊत्पन्नाचे विक्रम केले ते पुढं पंधरा वर्षांनी 'शोले' बोलपट येईतो अबाधित राहिले. शापूरजी पालनजींची गुंतवणूक कितीतरी पटींनी वसूल झाली. के. असीफ, नौशाद व लता मंगेशकर हयांची नावं या सिनेमाच्या इतिहासात कायमची कोरली गेली. सिनेजगतातले बहुतेक सर्व मान सन्मान हया बोलपटाच्या वाटयाला आले. १९६० चा सर्वोत्तम बोलपट, सर्वात उत्तम छायाचित्रण व सर्वोत्क्रृष्ट संवादलेखन अशी तीन मानाची 'फिल्मफेअर' ॲवॉर्डस 'मुगले आझम' ला मिळाली. याला एक गालबोट मात्र लागलं. सर्वोत्तम संगीताबद्दलचे ॲवॉर्ड त्या वर्षी 'दिल अपना और प्रीत परायी' ला मिळालं. त्यामुळे नौशादांसह सगळेच नाराज झाले. पुढं ब-याच वर्षांनी त्यावेळचे 'फिल्मफेअर' चे संपादक जे. सी. जैन हयांना छेडलं असता त्यांनी मोठं मासलेवाईक उत्तर दिलं. 'मुगले आझम'चं संगीत 'इल्मी' (इंटेलेक्टयुअल, बुद्धिगम्य) होतं तर 'दिल अपना और प्रीत परायी' चं संगीत 'फिल्मी' होतं. आज पन्नास वर्षांच्या कालखंडानंतर हे 'इल्मी' संगीतच

रसिकांच्या मनात कायमचं जाऊन बसलेलं आहे. चिरकाळ तिथंच राहणार पण आहे.

'मुगले आझम' बोलपटातल्या गाण्यांच्या यादी
[बोलपटात येणा-या क्रमानुसार]
गाण्याचे बोल, गायक / गायिका, राग, कालावधी (मिनिटं, सेकंद),

----

१. शुभ दिन आयो - उस्ताद बडे गुलाम अली खान (१,२०)
२. मोहे पनघट पे नंदलाल - गारा ठुमरी - लता मंगेशकर (३,५५)
३. तेरी महेफील में किस्मत - लता, शमशाद व कोरस (५,०५)
४. ऐ इष्क यह सब दुनियावाले-कव्वाली-लता मंगेशकर (३,५०)
५. प्रेम जोगन बन-राग सोहोनी-उ. बडे गुलाम अली खान (४,५५)
६. मोहब्बतकी झूठी-राग दरबारी कानडा-लता मंगेशकर (२,५७)
७. हमें काश तुमसे मोहब्बत ना होती - लता मंगेशकर (३,५०)
८. प्यार किया तो डरना क्या - राग मेघ - लता मंगेशकर (६,५०)
९. बेकस पे करम किजीये-राग केदार, ना-लता मंगेशकर (३,५०)
१०. अय मोहब्बत जिन्दाबाद - महंमद रफी व कोरस (६,३०)
११. यह दिलकी लगी - राग जयजयवंती - लता मंगेशकर (५,१०)
१२. खुदा निगेहबान हो - राग यमन, नात - लता मंगेशकर (३,२०)

'मुगले आझम' बोलपटातल्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका

----

७८ गतीच्या (लाखेच्या व फुटू शकणा-या)

१]एन.५३२०४ अय मुहब्बत जिंदाबाद - भाग १ व २
२]एन.५३२०५ तेरी महेफिल में किस्मत आजमा कर - भाग १ व २
३]एन.५३२०६ बेकस पे करम / खुदा निगेहबान हो [*]
[*अेंजल लेबल रेकॉर्ड - इस्लामिक (नात) रेकॉर्ड]
४]एन.५३२०७ प्यार किया तो डरना क्या / मोहे पनघट पे
५]एन.५३५१२ मोहब्बतकी झूठी कहानी / यह दिल की लगी
६]एन.५३५१३ प्रेम जोगन बन के / शुभ दिन आयो
७]एन.५३७१९ हमें काश तुमसे / प्यार किया तो डरना क्या
८]एन.५३८३१ अय इष्क ये सब दुनियावाले/ हमें काश तुमसे

वाद्यसंगीत (क्लॅरिओनेट तर्ज) - मा.इब्राहिम कृत

१]एन.९२६४१ प्यार किया तो डरना क्या / तेरी महेफील में

---

४५ गतीच्या (प्लास्टिकच्या, फुटू न शकणा-या)

१]टी.ए.ई.१०३७
[स्टर्लिंग इन्वेस्टमेन्ट कॉर्पोरेशन प्रा.लि.कृत फिल्म - मुगले आझम]

तेरी महेफील में किस्मत आजमाकर - लता, शमशाद व पार्टी
प्यार किया तो डरना क्या / खुदा निगेहबान हो - लता मंगेशकर

---

३३ गतीच्या (प्लास्टिकच्या, फुटू न शकणा-या)

१]३ए.ई.एक्स ५००३
[स्टर्लिंग इन्वेस्टमेन्ट कॉर्पोरेशन प्रा.लि.कृत फिल्म - मुगले आझम]

पहली बाजू
मोहब्बतकी झूठी कहानी - लता मंगेशकर
प्यार किया तो डरना क्या - लता मंगेशकर
बेकस पे करम किजीये - लता मंगेशकर
खुदा निगेहबान हो - लता मंगेशकर
अय मोहब्बत जिन्दाबाद - भाग १ व २ - महंमद रफी व कोरस

दूसरी बाजू
मोहे पनघट पे - लता मंगेशकर
यह दिलकी लगी - लता मंगेशकर
तेरी महेफील में किस्मत - भाग १ व २ - लता, शमशाद व कोरस
प्रेम जोगन बन के - उस्ताद बडे गुलाम अली खान
शुभ दिन आयो - उस्ताद बडे गुलाम अली खान



डॉ.सुरेश चांदवणकर, नेव्हीनगर, कुलाबा मुंबई
१२ जुलै २०१०. chandvankar.suresh@gmail.com